महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती, जि. पुणे
Email : deangmcbaramati@gmail.com Website :- www.gmcbaramati.com
प्लॉट नंबर १०७, एमआयडीसी , बारामती ४१३१३३

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे (बाहयस्त्रोताव्दारे) कंत्राटी पध्दतीने वर्ग-४ कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत.**

# जाहिर निविदा सुचना

महाराष्ट्र राज्यस्तरीय इच्छुक ठेकेदार/निविदाधारकांना जाहिर सुचना देणेत येत आहे की, शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे (बाहयस्त्रोताव्दारे) एकत्रित रुपये - ८०००/- (रुपये- आठ हजार) वेतनावर, आवश्यक वर्ग -४ पदाचे स्वच्छता आणि दैनंदिन प्रशासकीय कामामध्ये सहाय्य करणेकरीता (मनुष्यबळ) उपलब्ध करुन देणेबाबतच्या निविदा प्रक्रीयेचा अर्ज व अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबतची माहिती या संस्थेच्या **www.gmcbaramati.org** संकेतस्थळावर प्रसारीत / प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर निविदा अर्ज भरण्याचा दिनांक १२/१२/२०१९ रोजी ते दिनांक १९/१२/२०१९ राहील. दि.१९/१२/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकृत राहतील व त्यानंतर आलेल्या निविदा कोणत्याही सबबीवर स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

Sd.
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्याल व सर्वोपचार रुग्णालय,
बारामती,जिल्हा-पुणे

जा.क्र. शावैमब/बाहयस्त्रोत निविदा/1970-71/१९
दिनांक :02/12/२०१९

Scanned by CamScanner

# अ पाकिटात सादर करावयाचे कागदपत्रे

१) संबंधित ठेकेदाराकडे लेबर कंत्राटी कायदा १९७० चा परवाना असणे आवश्यक आहे.

२) प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म.बारामती, यांचे नावे बयाणा / सुरक्षा ठेव रक्कम रुपये २०,०००/- चा डी. डी. जोडणे आवश्यक आहे.

३) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ चा परवाना असणे आवश्यक आहे. मागील ६ महिन्याचे ई.पी.एफ भरले असल्याबाबतचे चलने व ई.सी.एस. जोडणे आवश्यक आहे.

४) राज्य कामगार विमा अधिनियम १९४७ चा परवाना असणे आवश्यक व मागील सहा महिन्याचे चलने जोडणे आवश्यक आहे.

५) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. तसेच डिसेंबर २०१८ पर्यंतची जी.एस.टी भरलेबाबतचे पुरावे जोडणे आवश्यक आहे.

६) मागील सलग तीन वर्षाची एकुण आर्थिक उलाढाल किमान ५० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असावी तसा चार्टर्ड अकांटेंटचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

७) सरकारी/निमसरकारी संस्था/खाजगी संस्थेमध्ये सफाईगार ठेका चालवण्याचा अनुभव असल्याबाबतचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

८) राष्ट्रीयकृत बॅकेची बॅक सोलव्हसी किमत ५० लाखाची असल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

९) मागील सलग तीन वर्षाचा आयकर भरल्याचा दाखला (आय.टी.आर) जोडणे आवश्यक आहे.

१०) ठेकेदाराचे प्रतीज्ञापत्र आणि हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

११) टेंडर मधील नमुद अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतीज्ञापत्रामध्ये स्वाक्षरी व शिक्यासह जोडणे आवश्यक आहे.

१२) **पार्टनरशिप असल्यास** त्याबाबतचे पार्टनरशिप डिड झालेबाबत करारपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच पार्टनरशिप (भागीदारी) मधील डिड रजिस्ट्रेशन सर्टिफिकीट जोडणे आवश्यक आहे.

१३) महानगरपालीका/नगरपालीका/नगरपरिषद येथील आरोग्य विभागाचा नोंदणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१४) मुंबई दुकाने अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी क्रमांक पत्र जोडणे आवश्यक आहे.

१५) संस्थेचे पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे.

१६) **अर्ज / निविदा प्रक्रीया शुल्क रोख रुपये २०००/- (ना-परतावा)** भरलेबाबतची या महाविद्यालयातील प्रशासकीय कार्यालयाचे रोखपाल यांचेमार्फत आपणास प्राप्त झालेली शासकीय शुल्क पावतीची मागील व पुढील प्रत जोडणे बंधनकारक आहे.

वरील १ ते १६ क्रमातील सर्व आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. अ-१ मध्ये सादर करण्यात आलेली आहेत.

निविदाधारकाची स्वाक्षरी

निविदाधारकाचे / संस्थेचे नाव :

संस्थेचा शिक्का:

Scanned by CamScanner

## यशस्वी ठेकेदारने निविदा अटी शर्तीनुसार " अ " प्रपत्रात सादर करावयाचे बंधपत्र (करारनामा)

## नियम, अटी व शर्ती

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१४/प्र.क्र.१८/विसेवा-२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक ०८ मार्च २०१९ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे, (काल्पनिक पदे/बाहयस्त्रोताने)एकत्रित ८,०००/- वेतनावर, वर्ग-४ कंत्राटी कर्मचारी निविदा प्रक्रीयाव्दारे उपलब्ध करुन देणेकरीता निविदा प्रक्रीयेनुसार सुविधा राबविण्याचे मान्य करीत आहे.

सबब, प्रस्तुत बाबत संस्थेची गैरसोय होऊ नये व दैनंदिन स्वच्छतेची व प्रशासकीय कामे सुरळीत पार पाडणे शक्य व्हावे याकरीता संचालनालयाचे परिपत्रक क्र. संवैशिवसं/ साफसफाई/ बाहयस्त्रोत/२१०५४/२०१६, दिनांक १९ ऑक्टोंबर, २०१६ नुसार प्रदान केलेल्या आदेशाचे अनुपालन करुन, भविष्यात कोणत्याही टप्प्यावर शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यास अथवा शासन स्तरावरुन सेवा पुरवठादाराची नियुक्ती केल्यास आपणास पत्रान्वये देण्यात आलेली मान्यता रद्द समजण्यात यावी, तसेच आपल्या संस्थेस शासना मार्फत अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे मला सदर मनुष्यबळ पुरवठयाची देयके अदा होतील व देयकाबाबत कोणतीही न्यायालयीन बाब निर्माण करणार नाही. याची मला जाणीव करुन देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मनुष्यबळ आणि त्यांचे मार्फत स्वच्छतेच्या सेवा सुविधा उपलब्ध करुन देत आहे.

१) निविदा प्रक्रीयेत यशस्वी निविदाधारक म्हणून आपल्या संस्थेस, सदर मनुष्यबळ सुविधा पुरविणे करीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या संस्थेतील विभागीय समिती मार्फत निवड करण्यात आली असून, मी स्वतः निविदाधारक अथवा संस्थेने स्वाक्षरी करण्याकरीता प्राधिकृत केलेला प्रतिनिधी असल्याने, खालीलप्रमाणे अटी व शर्ती आम्हास/संस्थेस मान्य असून, शासन/प्रशासन/संस्थेने विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून, माझ्या/आमच्या संस्थेच्या वतीने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या संस्थेस (बाहयस्त्रोताव्दारे) इमारती व आवारातील स्वच्छता करणेकरिता एकत्रित वेतनावर ठेका/कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता निविदा प्रक्रीयेनुसार करारनामा लिहून देत आहे.

२) वर्क ऑर्डर मिळालेपासून सात दिवसाचे आत रु.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर रजिस्ट्रर्ड नोंद करुन देणे आवश्यक आहे करारनाम्यातील कोणत्याही अटी/शर्तीचा भंग झालेस मंजूर केलेला ठेका कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द् करण्यात येईल. यास माझी/संस्थेची कोणतीही हरकत रहाणार नाही. तसेच निविदेतील अटी शर्तीनुसार शासनाने विहीत केलेल्या रकमेच्या १ टक्के सुरक्षाठेव रक्कम रुपये ३००००/- (रु. तीस हजार फक्त) इतक्या रकमेचा डि.डि (डिमांड ड्राफ) हा मा. प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती यांचे नावे रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे भरणा करणे बंधनकारक आहे. अन्यथा दिलेले आदेश रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

..२

Scanned by CamScanner

३) ठेकेदाराने १८ वर्ष वयापेक्षा कमी वयाचे कर्मचारी नियुक्त करता येणार नाही. तसेच ठेकेदाराने या व्यवसायाच्या अनुषंगाने जे कोणतेही शासकीय कर/शुल्क असतील तर शासनाच्या संबंधीत खात्याकडे भरण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. याबाबत अथवा या संदर्भात कोणताही वाद/तक्रार निर्माण झाल्यास त्याचे निराकरण ठेकेदाराने संबंधीत शासन विभागाकडून करुन घेणे आवश्यक आहे.

४) पात्र व यशस्वी ठेकेदारांना शासन निर्णय क्र. पदनि- २०१४/प्र.क्र.१८/वैसेवा-२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक ०८ मार्च २०१९ अन्वये (महाविद्यालय पद निर्मिती) नुसार आदेशित केलेले वर्ग-४ (काल्पनिक पदे/ बाहयस्त्रोताने) खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येईल.

| क्र. | पदाचे नाव | एकत्रित वेतन | आवश्यक पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | दप्तरी | रु. ८०००/- | ०४ |
| २ | शिपाई | रु. ८०००/- | २० |
| ३ | हमाल | रु. ८०००/- | ०१ |
| | | एकुण | २५ पदे |

५) **दैनंदिन स्वच्छता/सहाय्य कामांकरीता वरील २५ पदांपैकी या संस्थेस आवश्यकते नुसार टप्प्या - टप्प्याने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेतले जातील त्याप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.**

६) महाविद्यालयाची अंतर्गत व आवारातील स्वच्छता दिवसातुन तिन वेळा सकाळी ७.००, दुपारी २.०० व सायंकाळी ६.०० वाजता करावी लागेल.

७) महाविद्यालयातील सर्व फ्लोरींग, सिलिंग, खिडक्या, दरवाजे, तावदाने, टेबल्स, खुर्च्या, पंखे, फर्निचर्स, कपाटे व संगणक व प्रत्येक विभागातील यंत्रे, उपकरणे इ वस्तू यांची संबंधित विभागातील अधिकाऱ्यांचे निरिक्षणामध्ये दैनंदिन स्वच्छता करणे बंधनकारक राहील.

८) महाविद्यालया बाहेरील आवार तसेच महाविद्यालयाच्या इमारतीमधील संडास व बाथरुम तसेच कॉमन संडास व बाथरुम यांची दररोज नियमितपणे स्वच्छता करणे तसेच महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेतील सर्व आवश्यक कचरा वेगवेगळया पिशवीत साठविणे व त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

९) महाविद्यालयातील तसेच कार्यालयातील स्वच्छता करणे बंधनकारक राहील.

१०) कर्मचा-यांना यशस्वी ठेकेदार/कंपनी यांनी गणवेश पुरवावा लागेल.

११) सदर हे काम प्रत्यक्षात ज्या तारखेपासुन आदेश देण्यात येईल त्या तारखे पासुन पुढील एक महिन्या करीता राहील.

१२) भविष्यात निविदाधारका मार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या कंत्राटी सफाईगार/स्वच्छता सेवक /कामगारास स्थायी अथवा इतर शासकीय फायदे मिळणार नाहीत. तश्या पध्दतीचा हक्क राहणार नाही.



Scanned by CamScanner

१३) ठेकेदार / कंपनीचे स्वतःचे नियुक्त सुपरवायझर यांना वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी सांगीतलेली सर्व कामे जबाबदारीने पार पाडण्याकरीता सुचित करणे बंधनकारक राहील.

१४) कंत्राटी कर्मचा-यांना झाडु व खराटे,डीटर्जेंट व डिसइनफेक्ट व मॉपिंगचे साधन ठेकेदारामार्फत स्वतः पुरवठा करतील व तसे बंधनकारक राहील.

१५) ठेकेदारांनी प्रत्यक्ष नेमलेल्या कर्मचा-यांचे वेतन धनादेश/बॅंक खात्याव्दारे अदा करणे आवश्यक राहील व त्या बाबतचा अहवाल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कार्यालयात करण्यात यावा.

१६) काम असमाधान कारक असल्यास कोणतेही कारण न दर्शविता कुठल्याही क्षणी करा रद्द करण्यात येईल.

१७) कंत्राटी कामगाराच्या सुट्टीच्या दिवशी दुसरा कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८) प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचे देयक मान्य दराप्रमाणे कार्यालयास सादर करावे. त्यावर उपलब्ध अनुदानाच्या आधारे रक्कमा प्रदान करण्या आधी दिल्या गेलेल्या स्वच्छता सेवेचा आढावा घेण्यात येईल व काम समाधानकारक असल्या नंतरच देयक अदा करण्यात येईल. तसेच सफाई / इतर कंत्राटी कामगारांकडून स्वच्छते दरम्यान शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास त्याची रक्कम सदर देयकात समायोजित करण्यात येईल.

१९) अनुदानाअभावी काही तांत्रिक अडचणीमुळे देयक अदा करण्यास विलंब झाल्यास देयकावर कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करण्यात येणार नाही अथवा न्यायालयात जाता येणार नाही.

२०) कंत्राटव्दारे कामावर असलेल्या अथवा कंत्राटदाराचे संस्थेमार्फत काम करणाऱ्यास काणत्याही मनुष्यबळाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.

२१) पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या स्वच्छता सेवक / सेवकांच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहील.

२२) आपणास वरील सर्व अटी व शर्थी मान्य आहे असे गृहीत धरुन तसेच आपण कार्यालयास सादर केलेला कागदपत्राच्या आधारावर हे कार्या-देश निर्गमीत करण्यात येतील.

२३) उपरोक्त करार हा कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे / मुदत वाढविणे / दंड शुल्क लावणे इ.बाबतचा सर्व अधिकार संस्थाप्रमुख यांनी राखुन ठेवलेबाबत मला जाणीव आहे.

२४) या संस्थेस शासना मार्फत प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल त्यामुळे देयकाबाबत कोणतेही वाद होणार नाही याची मला जाणीव करुन देण्यात आलेली असून, त्यानुसारचे मी सदर आदेश स्विकृत करीत आहे याची मला पूर्ण कल्पना आहे.

...४

Scanned by CamScanner

१३) ठेकेदार / कंपनीचे स्वतःचे नियुक्त सुपरवायझर यांना वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी सांगीतलेली सर्व कामे जबाबदारीने पार पाडण्याकरीता सुचित करणे बंधनकारक राहील.

१४) कंत्राटी कर्मचा-यांना झाडु व खराटे,डीटर्जेंट व डिसइनफेक्ट व मॉपिंगचे साधन ठेकेदारामार्फत स्वतः पुरवठा करतील व तसे बंधनकारक राहील.

१५) ठेकेदारांनी प्रत्यक्ष नेमलेल्या कर्मचा-यांचे वेतन धनादेश/बॅंक खात्याव्दारे अदा करणे आवश्यक राहील व त्या बाबतचा अहवाल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कार्यालयात करण्यात यावा.

१६) काम असमाधान कारक असल्यास कोणतेही कारण न दर्शविता कुठल्याही क्षणी करा रद्द करण्यात येईल.

१७) कंत्राटी कामगाराच्या सुट्टीच्या दिवशी दुसरा कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८) प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचे देयक मान्य दराप्रमाणे कार्यालयास सादर करावे. त्यावर उपलब्ध अनुदानाच्या आधारे रक्कमा प्रदान करण्या आधी दिल्या गेलेल्या स्वच्छता सेवेचा आढावा घेण्यात येईल व काम समाधानकारक असल्या नंतरच देयक अदा करण्यात येईल. तसेच सफाई / इतर कंत्राटी कामगारांकडून स्वच्छते दरम्यान शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास त्याची रक्कम सदर देयकात समायोजित करण्यात येईल.

१९) अनुदानाअभावी काही तांत्रिक अडचणीमुळे देयक अदा करण्यास विलंब झाल्यास देयकावर कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करण्यात येणार नाही अथवा न्यायालयात जाता येणार नाही.

२०) कंत्राटव्दारे कामावर असलेल्या अथवा कंत्राटदाराचे संस्थेमार्फत काम करणाऱ्यास काणत्याही मनुष्यबळाच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.

२१) पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या स्वच्छता सेवक / सेवकांच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहील.

२२) आपणास वरील सर्व अटी व शर्थी मान्य आहे असे गृहीत धरुन तसेच आपण कार्यालयास सादर केलेला कागदपत्राच्या आधारावर हे कार्या-देश निर्गमीत करण्यात येतील.

२३) उपरोक्त करार हा कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे / मुदत वाढविणे / दंड शुल्क लावणे इ.बाबतचा सर्व अधिकार संस्थाप्रमुख यांनी राखुन ठेवलेबाबत मला जाणीव आहे.

२४) या संस्थेस शासना मार्फत प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल त्यामुळे देयकाबाबत कोणतेही वाद होणार नाही याची मला जाणीव करुन देण्यात आलेली असून, त्यानुसारचे मी सदर आदेश स्विकृत करीत आहे याची मला पूर्ण कल्पना आहे.



Scanned by CamScanner

- संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई वतीने करारावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती यांना दिलेला आहे.

वरील अनुक्रमे क्र.१ ते २४ अंतर्गत नमूद सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य व बंधनकारक आहे.

सदरचा करारनामा लिहून देणार व लिहून घेणार या दोघांनाही मान्य असून तो आज दि. / /२०१९ वार रोजी लिहून दिला आहे.

साक्षीदार -

लिहून घेणार स्वाक्षरी :
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
बारामती

सही -

नाव -

पत्ता -
ठिकाण -
दिनांक -

साक्षीदार -

लिहून देणार स्वाक्षरी :

सही -

नाव -

पत्ता -

ठिकाण -
दिनांक -

Scanned by CamScanner

# ठेकेदाराचे प्रतिज्ञापत्र

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे (बाहयस्त्रोताव्दारे) इमारती व आवारातील स्वच्छता करणेकरिता एकत्रित वेतनावर, ठेका/कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत.

याबाबतचा टेंडरसेट मी/आम्ही काळजीपुर्वक वाचला असून, टेंडरमधील सर्व अटी व शर्तीप्रमाणे "अ" पाकीटामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे. मी/आम्ही सादर केलेली कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. या टेंडरमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत. मी/आम्ही सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यतेबाबत काही प्रश्न उदभवल्यास किंवा सदरची कागदपत्रे खोटी आहेत असे आढळल्यास टेंडरच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यास आणि टेंडरपोटी भरलेली बयाणा व अनामत रक्कम जप्त करुन माझे किंवा माझ्या संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेस माझी काही हरकत नाही.

तसेच सदर टेंडर प्रकरणी माझ्या/ संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या सर्व सेवकांचे लेबर लॉ अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबी कामगार विषयक कायदयाचे पुर्तता करण्याची जबाबदारी माझी/ संस्थेची राहील या संदर्भात एखादा कायदेशीर प्रश्न उदभवल्यास याची सर्व जबाबदारी माझी/संस्थेची राहील व ते माझ्यावर बंधनकारक राहील कामगार कायदयातील तरतूदींचे पालन करण्याची जबाबदारी सुध्दा माझी/ माझ्या संस्थेची राहील.

टेंडरदाराची स्वाक्षरी<br>
टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदाराचे नाव :- ..............................
..................................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता..........................
..................................................

टिप :- सदरचे हमीपत्र ठेकेदाराने १००/- रु. चे स्टॅम्प पेपरवर "अ" पाकिटात सादर करणे बंधनकारक आहे.

Scanned by CamScanner

## ठेकेदाराचे हमीपत्र

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे (बाहयस्त्रोताव्दारे) इमारती व आवारातील स्वच्छता करणेकरिता एकत्रित ८०००/- (रुपये आठ हजार) वेतनावर, वर्ग-४ पदांचे कत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत.

मी/आम्ही याकामाबाबतचे टेंडरसेट /टेंडरमधील नमुद सर्व अटी व शर्ती प्रमाणे सिलबंद पाकिटामध्ये सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे.

सदरची कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत तसेच या प्रतिज्ञापत्राव्दारे मी/आम्ही/आमचे कुटुंबीय/नातेवाईक या संस्थेचे अथवा शासकीय/निमशासकीय संस्थेचे सभासद/अधिकारी/कर्मचारी नाहीत, अशी या हमीपत्राव्दारे ग्वाही/हमी देत आहे.

टेंडरदाराची स्वाक्षरी
टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदाराचे नाव :- ..............................
..................................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता..........................
..................................................

टिप :- सदरचे हमीपत्र ठेकेदाराने १००/- रु. चे स्टॅम्प पेपरवर "अ" पाकिटात सादर करणे बंधनकारक आहे.

Scanned by CamScanner

## प्रपत्र "ब" सिलबंद लिफाफा

मी स्वतः / संस्था प्रमाणित करतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे (बाहयस्त्रोताव्दारे)एकत्रित ८०००/- (रुपये आठ हजार) वेतनावर, वर्ग-४ पदांचे इमारती व आवारातील स्वच्छता करणेकरिता कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध असून, आपल्या संस्थेस आवश्यक असलेली खालील प्रमाणे कंत्राटी सेवकांची पदसंख्या आपल्या मागणीप्रमाणे तात्काळ उपलब्ध करुन देईन व "अ" प्रपत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपलब्ध करुन दिलेल्या पदांचे प्रत्येकी प्रमाणे रुपये ८०००/- (रु.आठ हजार) शासनाने विहीत केलेली रक्कम मला मान्य आहेत.

वर्ग-४ (काल्पनिक पदे / बाहयस्त्रोताने)

| क्र. | पदाचे नाव | एकत्रित वेतन | आवश्यक पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | दप्तरी | रु. ८०००/- | ०४ |
| २ | शिपाई | रु. ८०००/- | २० |
| ३ | हमाल | रु. ८०००/- | ०१ |
| | | एकुण | २५ |

**त्याअनुषंगाने मी "अ" प्रपत्रात सादर केलेली आवश्यक कागदपत्रे व करारनामा जोडलेला असून, त्याचे तंतोतंत पालन करीन व आपल्या संस्थेची प्रशासकीय अडचण होऊ देणार नाही अशी या प्रपत्राव्दारे हमी देत आहे.**

टेंडरदाराची स्वाक्षरी

टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदाराचे नाव :- ..............................
..................................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता.........................
..................................................

Scanned by CamScanner